महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## सुरक्षा आणि सुविधाजनक प्रवासाचा योग्य पर्याय म्हणजे माझी मेट्रो

## मेट्रो संवाद कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी व्यक्त केले मत



नागपूर: नागपूर मेट्रोच्या चारही मार्गिकेवर मेट्रो सेवा सुरु असून, दिवसेंदिवस प्रवाश्यांच्या संख्येत भर पडत आहे. मेट्रोच्या ऍक्वा मार्गिकेवरील एलएडी कॉलेज आणि मातृसेवा संघ या या शैक्षणिक संस्थांमध्ये नुकत्याच झालेल्या मेट्रो संवाद कार्यक्रमात, संस्थांमधील विद्यार्थ्यांनी प्रवासाच्या सुरक्षितता आणि सोयीबद्दल त्यांचे दृष्टिकोन या दरम्यान व्यक्त करत मेट्रो ही त्यांची सर्वोच्च निवड असल्याचे प्रतिपादन केले.



**• मेट्रो एक सुरक्षित प्रवास**

विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रवासादरम्यान सुरक्षित वातावरण उपलब्ध करून दिल्याबद्दल एकमताने मेट्रोचे कौतुक केले. सुसज्ज कर्मचारी, स्वच्छ स्थानके, सुरक्षेबाबत पाळत ठेवणारी यंत्रणा आणि दृश्यमान सुरक्षा कर्मचार्यांसह, मेट्रो हे वाहतुकीचे एक आश्वासक साधन म्हणून ओळखले जात असल्याचे तेथील शिक्षकांनी या दरम्यान आपले मनोगत व्यक्त केले. मेट्रो सिस्टीमने दिलेली सुविधा हा एक महत्त्वाचा मुद्दा चर्चेत होता. विद्यार्थ्यांना सवलतीसह सहज प्रवेशयोग्यता, किमान प्रतीक्षा वेळ आणि प्रवासी अनुकूल सुविधा या घटकांचा उल्लेख केला जे अखंड प्रवासाच्या अनुभवात लक्षणीय योगदान देतात.

**• ग्रामीण भागांना जोडणारी मेट्रो**

हिंगणा परिसरात असलेल्या इसासनी रहिवाशी भागात मेट्रो संवाद घेण्यात आला होता, इसासनी ग्रामपंचायतच्या प्रांगणात, लोकप्रतिनिधींच्या समवेत मेट्रो संवादाचे आयोजन करण्यात आले. इसासनी वरून मोठ्या प्रमाणात नागपूरला शिक्षणासाठी, नोकरीसाठी किंवा खरेदीसाठी जाणाऱ्या नागरिकांना मेट्रोमुळे अनेक फायदे होत असल्याचे मत लोकप्रतिनिधींनी व्यक्त केले. पर्यावरण आणि खर्चाचा विचार, सुरक्षितता आणि सोयींच्या पलीकडे, येथील लोकांनी पर्यावरणावर मेट्रोचा सकारात्मक प्रभाव ओळखला. कमी झालेला कार्बन फूटप्रिंट आणि मेट्रो

प्रवासाची किफायतशीरता ही वाहतुकीची ही पद्धत निवडण्याची आकर्षक कारणे असल्याचे येथील जागृक नागरिकांनी व्यक्त केले.

नागपूर मेट्रोचा विस्तार आता नागपूर शहरापासून दूर नजीकच्या क्षेत्रामध्येही होणार असल्याने तेथील नागरिकांमध्ये जनजागृती आणि आता अस्तित्वात असलेल्या मार्गिकांवर प्रवासी संख्या वाढवण्याच्या दृष्टीने तसेच मेट्रोबद्दलच्या नागरिकांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या शंका, प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने, याशिवाय मेट्रोतील सुविधा आणि सवलतींबद्दल सविस्तर माहिती देण्याच्या दृष्टीने मेट्रोद्वारे नियमित मेट्रो संवाद घेतले जातात.

